पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/०१/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१५/०१/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा.आर.एस.कुमार
३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
४. मा.भारती फरांदे
५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
७. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

या शिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लडकत, मा.कुलकर्णी - कार्यकारी अभियंता, मा.काटकर - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामाकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.**

विषय क्र.२) से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे या कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..

विषय क्र.३) प्रभाग क्र.७ च-होली भोसलेवस्ती ते पठारेमळा १८ मी.रस्त्यावर सी.डी.वर्क बांधणे - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) दळवीनगर प्रभाग क्र.२१ भाजी मंडई बांधणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मुख्यलेखापाल नेमणुकीबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.२१ दळवीनगर मधील उद्योगनगर भागात मुख्यरस्त्याच्या दोन्ही बाजूने फुटपाथ करणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) दिघी गायरान स.नं.७७ येथे तारफेन्सिंग व कंपाऊंड करणे कामाचे सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) फ क्षेत्रीय कार्यालयातील उर्वरित उद्यानांची स्थापत्य विषयक कामे करणे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) प्रभाग क्र.२९ मधील कै.यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यानामध्ये कार्यालयातील फर्निचर, रंगरंगोटी व स्थापत्य विषयक कामे करणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) प्रभाग क्र.२९, से.क्र.१ भूखंड क्र.२ येथील उद्यानांसाठी आरक्षित जागेत स्केटिंग ट्रॅक करणेचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर येथील कै.बी.डी.किल्लेदार उद्यानांमध्ये स्थापत्य विषयक कामे करणेस सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) मनपा हद्दीतून जाणा-या नदीपात्रांच्या कडेने ३० मी. अंतराचा हरित पट्टा सोडून उर्वरित क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३) वॉर्ड क्र.६३ मधील नाल्यांची कामे करणेकामी र.रु.५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०१/०१/२०१६ व ०७/०१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ९ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : २८ विषय क्रमांक : १
दिनांक : १५/०१/२०१६ विभाग - पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक : मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/२/कावि/०५/२०१६, दि.०६/०१/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी घनकचरा व्यवस्थापन व हताळणी नियम २००० अंतर्गत उपविधी तयार करणे बाबत मा.तत्कालीन आयुक्त सो यांनी मा.अति. आयुक्त सो यांचे मार्गदर्शनाखाली करावयाच्या सुचना दिल्या होत्या त्यास अनुसरुन या क्षेत्रामधील तज्ञ तसेच विविध क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या अनुभवी स्वंयसेवी संस्थेचे प्रतिनिधी

(जनवानी परिसर, कागद काच पत्रा संघटना व संचालिका पर्यावरण प्रशिक्षण केंद्र इ.), मनपाचे अधिकारी यांचे सब ग्रुप तयार करणेत येऊन सदर सबग्रुप मार्फत तयार करणेत आलेल्या उपविधीच्या [Byelaws] च्या Pre Final Draft चे मा.अतिरिक्त आयुक्त सो यांचेकडे दिनांक ०३/०२/२०१४ रोजी सादरीकरण करणेत आले व यामध्ये मा.अतिरिक्त आयुक्त सो यांचे सुचनेनुसार आवश्यक ते बदल करणेत येऊन मा.आयुक्त सो यांचेकडे दिनांक १५/०९/२०१४ व दिनांक ०३/०२/२०१५ रोजी सादरीकरण करणेत आले. तसेच याबाबतचा उपविधी मसुदा [Draft Copy] महाराष्ट्र शासनाकडे माहितीकामी त्यांचे मागणीनुसार माहितीसाठी दिनांक १८/०२/२०१५ रोजी पाठविणेत आला आहे. घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अंतर्गत तयार करणेत आलेल्या उपविधी मसुदा मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन अंतिम मंजुरीकामी तसेच अंमलबजावणी करणेकामी महाराष्ट्र शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी तयार केलेला उपविधी मसुदा महाराष्ट्र शासनाकडील अंतिम मान्यता येईपर्यंत मा.मनपा सभेच्या मान्यतेने घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम अंतर्गत “मनपाचे घनकचरा व्यवस्थापन धोरण” म्हणून राबविणे शक्य आहे. तसेच या धोरणांस मा.महापालिका सभेची मान्यता मिळालेनंतर हा मसुदा मान्यतेकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेत येईल व त्यास मंजुरी मिळालेनंतर मनपा कार्यक्षेत्रात घनकचरा व्यवस्थापनासाठी उपविधीची अंमलबजावणी करणेत येईल. सबब घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अंतर्गत या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ स्वंयसेवी संस्थांचे प्रतिनिधी व मनपाचे अधिकारी यांचे सबग्रुपच्या मदतीने तयार करणेत आलेल्या मनपाचे घनकचरा व्यवस्थापन उपविधीच्या मसुद्यास अंतिम मंजुरीकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेसाठी व महाराष्ट्र शासनाकडील मान्यता मिळेपर्यंत सदरचे घनकचरा व्यवस्थापन उपविधी मनपाचे घनकचरा व्यवस्थापन धोरण म्हणून राबविणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : २९ — विषय क्रमांक : २

दिनांक : १५/०१/२०१६ — विभाग - जलशुध्दीकरण केंद्र से.२३

सुचक : मा.गोरक्ष लोखंडे — अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/जशुकें/१३/२०१६, दि.१४/०१/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे या कामासाठी मूळ प्रशासकीय मान्यता र.रु.३५,००,०००/- वगळता उर्वरित

र.रु.४,५०,०००/- ( अक्षरी र.रु.चार लाख पन्नास हजार फक्त ) च्या वाढीव रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३० विषय क्रमांक : ३

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.७ च-होली भोसलेवस्ती ते पठारेमळा १८ मी.रस्त्यावर सी.डी.वर्क्स बांधणे (नि.नो.क्र.४५/१३-२०१४-१५) या कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. तथापि सदर ठिकाणी सध्या सी.डी.वर्क्स बांधणे ऐवजी सदर कामातून प्रभाग क्र.७ च-होलीमधील चोविसावाडी येथील सी.डी.वर्क्स बांधणे व स.नं.५२९ येथे सी.डी.वर्क्स बांधणे व इतर ठिकाणी स्थापत्य विषय काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३१ विषय क्रमांक : ४

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

दळवीनगर प्रभाग क्र.२१ भाजी मंडई बांधणे या कामाच्या अंदाजपत्रकीय र.रु.१५,००,०००/- ( अक्षरी र.रु.पंधरा लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३२ विषय क्रमांक : ५

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर " मुख्यलेखापाल " या पदनामाचे वर्ग - १ मधील पे बँड र.रु.१५६०० - ३९१००, ग्रेड पे ६६०० मधील १ पद मंजूर आहे. सदरचे पद हे असंविधिक असून महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लेखाधिकारी पदावर काम करणा-या कर्मचा-यांमधून सेवाजेष्ठतेनुसार व पात्रतेनुसार " मुख्यलेखापाल " या पदावर पदोन्नती देऊन सदरचे पद भरणे आवश्यक आहे. तरी भविष्यात " मुख्यलेखापाल " हे पद रिक्त झालेनंतर महापालिकेच्या आस्थापनेवरील " लेखाधिकारी " या पदाचे सेवाजेष्ठतेनुसार, पात्रतेनुसार व नियमानुसार मुख्यलेखापाल या पदावर पदोन्नती देण्यात यावी व या पदासाठी

शासनाकडून प्रतिनियुक्तीवरील अधिका-याची नेमणुक करण्यात येऊ नये किंवा मागविणेत येऊ नये. लेखाधिकारी या पदाचे सेवाजेष्ठतेनुसार १.श्री.आव्हाळे सुरेश तुकाराम, २.श्री.इनामदार मिनानाथ माधव, ३.श्री.जगदाळे तानाजी माधवराव हे कर्मचारी “मुख्यलेखापाल” या पदाचे पदोन्नतीचे **(Consideration Zone)** विचार करणेस पात्र असून त्यांची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव, गोपनीय अहवाल विचारात घेऊन “मुख्यलेखापाल” या पदावर सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रशासन विभागाने या संदर्भात तपासणी करुन प्रस्ताव फेरसादर करावा व या पदावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठवू नये असे शासनास कळविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३३ विषय क्रमांक : ६

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२१ दळवीनगरमधील उद्योगनगर भागात मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूने फुटपाथ करणे व कलर पेव्हर टाईल्स बसविणेच्या कामास सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३४ विषय क्रमांक : ७

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

दिघी स.नं.७७ येथील गायरानात तारफन्सिंग व कंपाऊंड करण्याचे काम सध्या चालू असून, कंपाऊंड वॉलला प्लास्टर करुन पेंन्टिग करणे आवश्यक आहे. सदर बाबींमुळे कामाचे खर्चात वाढ अपेक्षित आहे. तरी विषयांकित कामाचे सुधारित र.रु.५०,००,०००/- ( अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त ) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३५ विषय क्रमांक : ८

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

फ क्षेत्रिय कार्यालयातील उद्यानांची स्थापत्य विषयक कामे करणे हे काम सध्या चालू आहे. परंतु या कामामधून फ प्रभागातील से.क्र.२२ मधील आंबेडकर उद्यान, मधुकर पवळे

शाळेजवळील प्लॉट तसेच स्पाईन रस्ता येथील स्थापत्य विषयक कामे करण्याची मागणी मा.नगरसदस्यांकडून होत आहे. या कामाचा विचार करता विषयांकित कामासाठी सुधारित र.रु.५०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामाचे सुधारित रक्कम रुपये - ५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३६ विषय क्रमांक : ९

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२९ मधील कै.यशवंतराव चव्हाण गुलाबपुष्प उद्यानामध्ये कार्यालयातील फर्निचर व रंगरंगोटीची कामे करणे व इतर स्थापत्य विषय कामे करणे या कामामधून गुलाब पुष्प उद्यानामध्ये उद्यान विभागाचे कार्यालयाचे फर्निचर, रंगरंगोटी करण्यात येणार आहे. परंतु कार्यालयासाठी नविन टॉयलेट ब्लॉक, जुन्या इमारतीचे नुतनीकरणाची वाढीव कामे सदर कामामधून करण्यात येणार आहेत. त्यामुळे या कामासाठी सुधारित र.रु.५०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामाचे सुधारित रक्कम रुपये - ५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३७ विषय क्रमांक : १०

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२९, से.क्र.१, भूखंड क्र.२ येथील उद्यानांसाठी आरक्षित जागेत स्केटिंग ट्रॅक करणेचे काम सध्या चालू असून सदर कामामध्ये त्या ठिकाणी सिमाभिंत बांधणे, प्रेक्षक गॅलरी व शेड करण्याची मागणी मा.नगरसदस्यांनी केलेली आहे. सदर कामामुळे कामाच्या खर्चात वाढ होणार असून सुधारित र.रु.५०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी विषयांकित कामाचे सुधारित रक्कम रुपये - ५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३८ विषय क्रमांक : ११

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.३९ मधील कै.बी.डी.किल्लेदार उद्यानामध्ये जॉगिंग ट्रॅक करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर येथील बी.डी.किल्लेदार उद्यानामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे कामामधून सदर काम करणे शक्य आहे. सदर कामासाठी सुधारित र.रु.४५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामाचे सुधारित रक्कम रुपये - ४५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३९ विषय क्रमांक : १२

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

सन १९८२ मध्ये ज्या गावांचा महापालिका हद्दीत समावेश झाला आहे अशा पवना नदीच्या पात्राचे दोन्ही बाजूकडील गावांकरिता व इंद्रायणी व मुळा नदीच्या पिंपरी चिंचवड हद्दीच्या भागाकरिता शासनाचे निर्देशानुसार मंजूर विकास योजनेतील नदीचे पात्रापासून ३० मी. हरित पट्टयातील नदीचे हद्दीपासून किमान (३० मी.अंतराचा हरित पट्टा सोडून) उर्वरित क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणेकामी फेरबदलाची कार्यवाही करणेस व तदनुषंगीक फेरबदलाची सर्व वैधानिक प्रक्रीया पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरी पाठविणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४० विषय क्रमांक : १३

दिनांक : १५/०१/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१५-१६ मध्ये पान क्र.१५५, अ.क्र.१६ वरती वॉर्ड क्र.६३ मधील नाल्यांची कामे करण्याचे काम निविदा क्र.८/३१-२०१५-१६ अन्वये चालू आहे. सदर कामांतर्गत प्रभाग क्र.६३ कासारवाडी रेल्वे लाईनच्या कडेने नाल्याचे काम करणेत आले आहे. सदर नाल्याचे उर्वरित काम करणे आवश्यक आहे. सदर कामास र.रु.३०,००,०००/- इतकी रक्कम कमी पडत असल्याने वाढीव कामासाठी अंदाजपत्रकीय

रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे. तरी सदर कामास सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( नंदा विकास ताकवणे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२९/२०१६
दिनांक : १६/०१/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.